| | |
|---|---|
| प्राप्त तारीख | ०८.११.२०२२ |
| नोंदणी तारीख | ०८.११.२०२२ |
| निकाल तारीख | ०८.०३.२०२३ |
| कालावधी | **०४ महिने** |

## अहेरी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, अहेरी यांचे न्यायालयात

[प्रकरणांत निर्णय देणारे पिठासीन अधिकारी **अमोलकुमार अ. देशपांडे**]

**फौजदारी किरकोळ अर्ज क्र. २६९/२०२२**
[**CNR- MH-GA07-000977-2022**] **निशाणी – १५**

**श्रीमती पुष्पा शंकर येमुलवार,**
वय ५० वर्षे, व्यवसाय – घरकाम,
राहणार आलापल्ली, तालुका अहेरी,
जिल्हा गडचिरोली. } **अर्जदार**

**विरुद्ध**

**सचिव/निबंधक,**
ग्राम पंचायत आलापल्ली,
तालुका अहेरी, जिल्हा गडचिरोली. } **गैरअर्जदार**

**अर्ज महाराष्ट्र जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) प्रमाणे**

अर्जदारातर्फे सुविद्य विधीज्ञ **श्री. उदयप्रकाश एस. गलबले**
गैरअर्जदारांतर्फे कोणीही नाही.

## न्यायनिर्णय

[आज दिनांक **०८ मार्च २०२३** रोजी उद्घोषित]

1. अर्जदाराच्या पतीच्या मृत्युची नोंदणी न झाल्यामुळे, तशी मृत्युची नोंद संबंधीत अभिलेखी घेण्यात यावी यासाठी अर्जदाराने सदर अर्ज दाखल केला आहे.

**अर्जात नमुद कथने**

2. अर्जदाराचे पती नामे **शंकर नानाजी येमुलवार** हे दि. १९.०९.२०११ रोजी मरण पावले आहेत. अर्जदाराला शासकीय कामाकरीता मृत्यु नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता

भासली असता गैरअर्जदाराकडे तशी मागणी केली होती. मात्र, गैरअर्जदाराच्या अभिलेखी अर्जदाराच्या पतीच्या मृत्युची नोंद नसल्याने गैरअर्जदाराने त्यांना प्रमाणपत्र दिले नाही. उलट, संबंधित तारखेला मृत्युची नोंद नाही असा दाखला दिला आहे. सबब तशी मृत्युची नोंद करण्याचे निर्देश गैरअर्जदाराला द्यावेत अशी विनंती करत अर्जदाराने हा अर्ज दाखल केला आहे.

**हरकत वा उजर**

3. निशाणी १३ नुसार जाहीरनामा गैरअर्जदार कार्यालयाच्या प्रसिद्धीफलकावर लावुनही कुणीही हरकत वा उजर घेतला नाही असे निशाणी ०८ वरील गैरअर्जदाराच्या पत्रानुसार स्पष्ट होते. त्याचप्रमाणे दि. ३०.११.२०२२ रोजी प्रकाशित 'दैनिक पुण्य नगरी' या वर्तमानपत्रात अर्जदाराने या न्यायालयाच्या आदेशान्वये मृत्युची नोंद संबंधित नोंदवहीमध्ये घेण्याबाबत व तसे प्रमाणपत्र मिळणेबाबत सदर न्यायालयात अर्ज दाखल केला असून त्यावर कोणाचा आक्षेप असल्याबाबतचा जाहीरनामा प्रसिध्द केलेला असून दाखल केला आहे. सदर जाहीरनामा प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत कोणीही उजर अथवा आक्षेप घेतल्याचे दिसून येत नाही.

**पुरावा**

4. अर्जदाराने आपले सरतपासणीचे शपथपत्र **निशाणी ०९** नुसार पुराव्याचे शपथपत्र सादर केले आहे. अर्जदाराच्या बाजुने साक्ष देण्यासाठी साक्षीदार गणपत बोंदाजी तावाडे यांचे शपथपत्र **निशानी १०** प्रमाणे पुराव्याचे शपथपत्र सादर केले आहे. त्यासोबतच अर्जदाराने गैरअर्जदाराने दिलेले नोंद नसल्याचा दाखला (निशाणी ११), अर्जदाराचे आधारकार्ड ओळखपत्राची पडताळलेली प्रत (निशाणी १२) आणि दि. ३०.११.२०२२ रोजी प्रकाशित 'दैनिक पुण्य नगरी' वर्तमानपत्राचा संबंधित जाहीरनामा असलेला अंक (निशाणी १३) असा पुरावा सादर केला आहे. त्यानंतर पुरावा सादर करणे नाही अशी अर्जदाराची पुरसिस **निशाणी १४** ला आहे.

5. त्यानंतर शेवटच्या टप्प्यात मी अर्जदाराच्या सुविद्य विधीज्ञांचा या प्रकरणाबाबतचा युक्तिवाद ऐकला आहे.

**विचाराधीन प्रश्न**

6. याप्रकरणी अंतिम आदेश पारीत करतांना मला काही निष्कर्ष मांडणे गरजेचे असल्याने माझे समोर खालील प्रश्न उद्भवतात. त्या प्रश्नांची उपलब्ध पुराव्याच्या आधारे आणि खाली नमूद केलेल्या कारणमिमांसे आधारे उत्पन्न होणारी उत्तरे मी आज रोजी मांडली आहेत. ते प्रश्न, त्यांची उत्तरे आणि उत्तरांमागील कारणमिमांसा न्यायनिर्णयाच्या पुढील भागात शब्दबध्द केली आहे.

| अ.क्र. | विचाराधीन प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र जन्म–मृत्यू नोंदणी नियम २००० च्या नियम ९ पोटनियम (३) नुसार अर्जदाराच्या पतीच्या मृत्यु तारखेची नोंद घेण्याचा आदेश मिळण्यास अर्जदार पात्र आहे, हे ती सिध्द करत काय? | **होय** |
| २ | काय आदेश पारित करता येतील? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

**प्रश्न क्र.१ च्या अनुषंगाने :**

7. प्रकरणाच्या गुणवत्तेकडे वळण्याआधी, उपरोक्त नियम ९ पोटनियम (३) काय आहे हे स्पष्ट करणे गरजेचे आहे. सदर नियम ९ पोटनियम (३) हा जन्म मृत्यू नोंदणी नियम, १९७६ च्या नियम १० पोटनियम (३) शी सुसंगत आहे. त्यानुसार जर जन्म किंवा मूत्यू झाल्यापासून एक वर्षाचे आत तशी नोंद अभिलेखी संबंधीत अधिकाऱ्याकडे केली नसल्यास उशिरा नोंद घेता येते. मात्र माननीय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपिठाने **फ्रिडम फर्म थ्रु निणसी मोहन बेबी .वि. बाल कल्याण समिती तथा चाईल्ड वेलफेअर कमीटी, नागपूर व इतर** या फौजदारी जनहित याचिका क्रमांक ०४/२०१३ या प्रकरणात हे स्पष्ट केले आहे की, अशी उशिरा नोंद घ्यावयाची असल्यास तसा स्पष्ट आदेश प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांनी पारीत केला असणे गरजेचे आहे.

8. अर्जदाराच्या व साक्षीदार गणपत बोंदाजी तावाडे यांच्या शपथेवरील कथनांचा विचार करता अर्जदाराच्या पतीच्या मृत्यु तारखेची नोंद नाही यावरुन मृत्यु तारखेपासुन एका वर्षाच्या आत नोंद घेतली नव्हती असे स्पष्ट होते. ज्या प्रकरणात उपरोक्त निर्देश दिले आहेत ते प्रकरण जनहित याचिका होती हे दुर्लक्षित करता येणार नाही. निव्वळ मृत्यु तारखेची नोंद नसल्यामुळे अगर तशी नोंद घेण्याचे पर्याप्त ज्ञान व जाणीव अर्जदाराला नसल्यामुळे अर्जदाराच्या पतीच्या मृत्यु तारखेची नोंद संबंधीत अभिलेखात घेण्याचा आदेश पारीत करणे न्यायोचित आहे. त्याचप्रमाणे अर्थातच, अर्जदाराने पुरविलेल्या माहितीस, वर्तमानपत्रात जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून कुणीही आक्षेप घेतला नसल्याने अर्जदारांच्या कथनांना पुष्टी मिळते. तसेच शपथेवरील कथने खोटी निघाल्यास होणाऱ्या सर्व पुढील परिणामांस अर्जदार स्वतःच जबाबदार असणार आहे.

9. त्यामुळे अर्जातील कथने, अर्जदाराचा पुरावा आणि उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे अर्जदाराच्या पतीच्या मृत्यु तारखेची नोंद करण्यासाठी आवश्यक आदेश मिळण्यास अर्जदार

पात्र आहे, या निष्कर्षाप्रत मी आलो आहे. म्हणून या विचाराधीन प्रश्न क्र.१ ला **'होय'** असा निष्कर्ष मांडत, मी पुढील आदेश पारीत करित आहे.

## आदेश

1. महाराष्ट्र जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ च्या कलम १३ पोट नियम (३) नुसार आणि महाराष्ट्र जन्म मृत्यू नोंदणी नियम २००० च्या नियम ९ पोटनियम (३) चा विचार करता, अर्जदाराचे पती नामे **शंकर नानाजी येमुलवार** हे **दिनांक १९.०९.२०११** रोजी **मरण पावले** अशी नोंद गैरअर्जदार यांनी घ्यावी, असा आदेश हे न्यायालय पारीत करीत आहे.
2. अशी नोंद घेतांना अर्जदार जर विलंब शुल्क देण्यास बांधील असेल तर ते शुल्क त्याच्याकडून स्विकारल्याशिवाय नोंद घेऊ नये असे देखील स्पष्ट करण्यात येते.
3. अर्जदाराने या न्यायनिर्णयाची प्रमाणीत प्रत गैरअर्जदारावर स्वखर्चाने बजवावी.

आज दिनांक ०८.०३.२०२३ रोजी उद्घोषित.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by AMOLKUMAR ANILKUMAR DESHPANDE
Date: 2023.03.10 13:43:07 +0530

**[अमोलकुमार अ. देशपांडे]**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, अहेरी
[न्यायिक अधिकारी संकेतांक MH02091]

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file order are same word to word as per the original Judgment or Order.

Name of the stenographer :- J.A. Gadekar, Grade -III.
Name of the Court :- C.J.J.D. & J.M.F.C. Aheri,